बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | शुक्रवार,दि.१९जुलै २०२४ | वर्ष३रे | अंक३५५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


## रक्ताच्या सह्याचे निवेदन

तलवाडा:लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानीमीत्त विभागीय आयुक्त कार्यालय येथे लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी देण्यात यावी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावे या संबंधित धरणे आंदोलन करून आयुक्तांना रक्ताच्या सह्याचे निवेदन देण्यात आले यावेळी लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राधाजी शेळके ,जिजाबाई शेळके, भंडारी शिवाजी, शिव शेळके, गणपत कांबळे, विनायक वाघोले, महादेव घनगाव, शंकर पवार ,अंकुश कांबळे ,रमेश दाभाडे ,बाबासाहेब पाटोळे, एमडी वावळे, दादाराव रोकडे, काशीबाई शिरवडे, शेषाबाई शिरवडे, गणेश घोडे, सर्जेराव पाटोळे, शरद चव्हाण, सह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते

लाडका भाऊ अशी कोणतीही नवीन योजना नाही

# लाडक्या भावांनो तुम्हाला फक्त गाजर दाखविलेय!!

## जितेंद्र आव्हाडांकडून शिंदे सरकारची पोलखोल?

## लाडकी बहीण योजने'ला राज्यभरातून प्रतिसाद

## अर्थसंकल्पात जाहीर केलेली योजनाच सांगितली

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला राज्यभरातून तुफान प्रतिसाद मिळत आहे. मात्र या योजनेनंतर विरोधकांनी सरकारवर टीका केली की लाडक्या बहिणीसाठी योजना आणलीत, मात्र बेरोजगार असलेल्या लाडक्या भावाला काहीच दिलं नाही. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की आमच्या सरकारने लाडक्या भावांसाठीही योजना आणली आहे. आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला (१६ जुलै) पंढरपुरात आयोजित एका कृषी मेळाव्यात एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांसाठी खास योजनेची घोषणा केली. या योजनेंतर्गत राज्य सरकारने तरुणांना कारखाने व उद्योगांमध्ये अप्रेन्टिसशिपसह स्टायपंड देण्याची घोषणा केली. याअंतर्गत १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना दरमहा सहा हजार रुपये, डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना आठ हजार रुपये आणि पदवीधर तरुणांना १० हजार रुपये स्टायपंड म्हणून मिळतील असं शिंदे यांनी सांगितलं.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या भावांसाठी या योजनेची घोषणा केली खरी, मात्र ही योजना आत्ता जाहीर केलेली नाही. ही योजना गेल्या महिन्यात सादर केलेल्या राज्याच्या

पान २ वर...



**अर्थसंकल्पात जाहीर केलेली योजना**

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना : यांतर्गत दरवर्षी राज्यातील १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना'- प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन म्हणून दिले जातील. यासाठी दरवर्षी सुमारे ६ हजार कोटी रुपये खर्च केले जातील.

### मुख्यमंत्री काय म्हणाले होते?

पंढरपूरमधील कृषी मेळाव्यात एकनाथ शिंदे म्हणाले होते, आपल्या सरकारने लाडकी बहीण योजना आणली तेव्हा काही लोक म्हणाले, लाडक्या बहिणीसाठी योजना आणलीत, आता लाडक्या भावांचं काय? मला त्या सगळ्यांना सांगायचं आहे की लाडक्या भावांवरही आमचं लक्ष आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्यासाठीही योजना आणली आहे. राज्यातील तरुण विद्यार्थी एखाद्या कारखान्यात अप्रेन्टिसशिप करतील, तिथे त्याला कामाचा अनुभव मिळेल आणि ते त्या-त्या कामात कुशल होतील. त्या अनुभवाच्या जोरावर त्यांना नोकरी देखील मिळेल. या काळात राज्य सरकार त्यांना स्टायपंड देईल.

## संघर्षशिल पत्रकार सुधाकर सोनवणेंची झुंज संपली

**दुःखद :** कॅन्सर सारख्या घातक आजाराने होते त्रस्त



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडच्या पत्रकारितेत आपल्या लेखणीचा एक वेगळा ठसा उमटविणारे चळवळीतील संघर्षशील प्रतिभावंत पत्रकार, वक्ते म्हणून सर्व परिचित असलेले सुधाकर सोनवणे गेल्या वर्षभरापासून कॅन्सर सारख्या घातक आजाराशी लढत होते. अनेक रुग्णालयामध्ये उपचार घेऊनही त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. अखेर सुधाकर सोनवणे यांची झुंज अपयशी ठरली आणि त्यांचे दुःखद निधन झाले. पत्रकार, सामाजिक संघटनांनी तसेच विविध क्षेत्रातील व्यक्तींनी सुधाकर सोनवणे यांना मदत केली. या मदतीमुळे सुधाकर सोनवणे आजारामधून उभारी घेतील असा अनेकांना विश्वास होता.परंतु नियतीने डाव साधला आणि दुर्दैवाने सर्वांच्या प्रयत्नांना आणि मदतीला अपयश आले. बुधवार (दि.१७) जुलै रोजी रात्री संघर्षशील पत्रकार सुधाकर सोनवणे यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्च्यात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा,आई, भाऊ,भावजयी असा परिवार आहे. दरम्यान गुरुवारी तागडगाव,ता.शिरुर,जिल्हा बीड येथील त्यांच्या मुळगावी सुधाकर सोनवणे यांचा अंत्यविधी झाला. आज शुक्रवार (दि.१९) जुलै रोजी अस्थी सावडण्याचा तर शनिवारी जलदान विधीचा कार्यक्रम होईल. सुधाकर सोनवणे यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून दैनिक पुण्यभूमी परिवार त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

## पूजा खेडकरांनंतर प्रफुल देसाई वादात

**बोंबला :** खोटी प्रमाणपत्रं देऊन अधिकारी झाल्याचा आरोप





पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

अधिकारी पूजा खेडकर यांच्यावरुन सुरु झालेला वाद ताजा असतानाच आता आणखी एक प्रकरण समोर आलं आहे. यूपीएससीची परीक्षा देऊन त्यानंतर दिव्यांग असल्याचं प्रमाणपत्र देऊन त्या कोट्याचा चुकीचा वापर करुन अधिकारी झाल्याचा आरोप प्रफुल देसाईंवर आहे. प्रफुल देसाई यांनी दिव्यांग असल्याचं खोटं प्रमाणपत्र दिल्याचा आरोप त्यांच्यावर आहे आरोप होण्याआधी ते घोडेस्वारी करताना दिसले. त्यावेळी त्यांनी मी माझं आयुष्य जगू नको का? असा सवाल केला आहे.२०१९ च्या परीक्षेत ५३२ वा नंबर आलेले प्रफुल देसाई यांच्या विरोधातले हे आरोप प्रकाशात येण्यासाठी त्यांची घोडेस्वारीच कारणीभूत ठरली. प्रफुल देसाई यांनी घोडेस्वारी करतानाचे फोटो सोशल मीडियावर


पान २ वर...

### देसाई यांच्यावर सोशल मीडियावर टीका

देसाईंचे फोटो व्हायरल झाल्यानंतर आता विविध युजर्सच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. युपीएससीमध्ये किती ताकद आणि जादुई शक्ती आहे, जे सनदी अधिकारी दिव्यांग होते ते आता रिव्हर राफ्टिंग आणि घोडेस्वारी करत आहेत. यआयआयएमएसचा प्रचार करण्यापेक्षा आता युपीएससीचा केला पाहिजे कारण तेच खरं रुग्णालय आहे अशी खोचक टीका करण्यात आली आहे.

## प्रतिभावंत नाटककराला मिळाला सन्मान

**डॉ.सतीश साळुंकेंनी मिळवली सर्वोच्च पदवी**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रसिद्ध नाटककार दिग्दर्शक डॉ. सतीश साळुंके यांनी ६३ व्या वर्षी नाट्य क्षेत्रातील एम.पी.ए. मास्टर ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स ही सर्वोच्च पदवी मेरिट श्रेणीत मिळवण्याचा विक्रम केला. त्यांच्या पत्नी सौ. सुधा साळुंके यांनीही ही पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन मिळवली. डॉ. साळुंके या पूर्वी नाट्य साहित्यात पी.एचडी. सह एम. ए, एम. कॉम, एम जे. (मास्टर ऑफ जर्नालिझम) या विविध क्षेत्रातल्या पदव्युत्तर पदव्याचे शिक्षण घेतले आहे. शिवाय त्यांना आदर्श शिक्षकाचा राष्ट्रपती पुरस्कार ही तत्कालीन राष्ट्रपती एपीजे अब्दुलकलाम यांच्या हस्ते मिळाला. साळुंखे यांच्या विविध १० पुस्तकांना राज्य शासनाच्या साहित्य व संस्कृती मंडळाचे उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार मिळाले असून नाट्यक्षेत्रात इतक्या ग्रंथांना पुरस्कार मिळवणारे ते महाराष्ट्रातील एकमेव नाटककार ठरले. इतिहासाच्या क्षेत्रातही त्यांचे 'बीड जिल्ह्याचा प्राचीन आणि मध्ययुगीन' इतिहास हा संशोधनात्मक ग्रंथ माइलस्टोन ठरला. या पुस्तकाच्या चार आवृत्ती प्रकाशित झाल्या. याशिवाय त्यांनी 'मराठवाड्याची रंगभूमी' नावाचा हजार पानांचा बृहद्ग्रंथ लिहून मराठवाड्याचा रंगभूमीचा इतिहास सर्वप्रथम महाराष्ट्र समोर मांडला. त्यांचे हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम व बीड जिल्ह्यातील शिलालेख हे

पान २ वर...

## विशाळगडावर हिंसाचार झालेल्या भागाची पाहणी

**तत्परता :** अजित पवार यांनी साधला ग्रामस्थांशी संवाद





विशाळगड/पुण्यभूमी प्रतिनिधी

अजित पवार यांनी विशाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या गावात आणि विशाळगडावरील अतिक्रमण झालेल्या भागाची पाहणी केली. तसेच ज्या अतिक्रमणावर प्रशासनाने कारवाई केली आहे त्याचीदेखील पाहणी केली. यावेळी अजित पवार यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. कोणाच्याही घरावर कारवाई होणार नाही, असं सांगत अजित पवारांनी ग्रामस्थांना आश्वस्त केलं. विशाळगडावर उसळलेल्या दंगलीप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई केली जाईल, असंही अजित पवार यावेळी म्हणाले. कोणीही कायदा व नियम हातात घेण्याचा प्रयत्न करू नये, अशा शब्दांत अजित पवारांनी सर्वांनाच खडसावलं.अजित पवार म्हणाले, निष्पाप लोकांच्या घरांचं नुकसान झालं आहे. इथे राहणाऱ्या लोकांचा आणि अतिक्रमणाचा काहीही संबंध नव्हता. त्यामुळे नुकसानग्रस्तांना प्रशासनाच्या वतीने प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत केलेली आहे. संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल.विशाळगडावरील अतिक्रमणाविरोधात माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी आंदोलन सुरू केलं होतं. या आंदोलनादरम्यान विशाळगडावरील वातावरण चिघळलं होतं. यावरून

पान २ वर...

# शिवसेनेचे सामाजिक ऋणानुबंध जोपासले!

**कौतुकास्पद** | **बीडच्या शिंदे गटाने राबविला उपक्रम**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्हा शिवसेनाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त दरवर्षी महाप्रसादाचे आयोजन केले जाते भाविकांना १००० डझन केळी आणि वृद्ध महिला व मुलांना ५०० छत्रींचे वाटप शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप व सचिन भैया मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले.

बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने दरवर्षी वृद्ध महिलांना छत्री व फळांचे वाटप केले जाते. यंदा तिसऱ्या वर्षीही हा उपक्रम उत्साहात घेण्यात आला. बुधवारी आषाढीनिमित्त सोमेश्वर मंदिर येथे भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व अनिल दादा जगताप यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादासोबतच मुळूक यांच्या वतीने वृद्ध महिला भाविकांना १००० डझन केळी व ५०० छत्र्यांचे वाटप जिल्हाप्रमुख अनिल जगताप व सचिन मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले. आषाढीनिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सेवा घडावी या उद्देशाने शिवसेनेच्या वतीने हा उपक्रम राबविला जातो असे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व अनिल जगताप यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास स्वप्निल गलधर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, युवा सेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, सुरेश तात्या शेटे, चंद्रकांत बांगर सर,

पान २ वर...



## काँग्रेसचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरला?

**चर्चेला उधाण :** खा. विशाल पाटलांचे वक्तव्य



मुंबई/पुण्यभूमीप्रतिनिधी

सांगलीमध्ये शिक्षक मतदार संघाचे आमदार जयंत आसगावकर यांनी शाळकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला सांगलीचे खासदार विशाल पाटील, पलूस-कडेगावचे आमदार विश्वजीत कदम यांनी देखील हजेरी लावली होती. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना खासदार विशाल पाटील यांनी विश्वजीत कदम यांची ओळख करून देत असताना आपल्या जिल्ह्याचे माजी मंत्री, आपल्या जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आणि भावी मुख्यमंत्री असा उल्लेख केला.

तसेच पाटील म्हणाले, मुख्यमंत्री व्हायला भविष्यवाणी करावी लागत नाही. त्यासाठी काही पंचांग वगैरे गोष्टी बघाव्या लागत नाहीत. विशाल पाटलांच्या या वक्तव्यावर एकच हशा पिकला होता.दरम्यान, विशाल पाटलांच्या या वक्तव्यानंतर विश्वजीत कदम यांनी देखील भाषण केलं. यावेळी कदम म्हणाले, बोलण्याच्या ओघात खासदार विशाल पाटील यांनी माझा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख केला. परंतु. याची कोणीही बातमी करू नका. याची बातमी केली तर सगळं जग बाजूला राहील आणि दुसरीच यंत्रणा माझ्या मागे लागेल. कदमांच्या या वक्तव्यावरही

पान २ वर...

# महाशक्ती'चे 'रिटर्न गिफ्ट'!

इ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी मुंबईत बोलताना महाराष्ट्र कसा आर्थिक विकासाचे केंद्र आहे आणि या संदर्भात तो अधिक व्यापक कामगिरी कशी करू शकतो यावर आशादायी भाष्य केले. त्याचे स्वागत. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी आरूढ झाल्यानंतर मोदींची ही पहिलीच मुंबई भेट. अंबानींच्या शेंडेफळाचे दोनाचे चार होत असताना उभयतांस आशीर्वाद देण्याच्या मिषाने पंतप्रधान मुंबईत हजर होते. खाशा पाहुण्यांतील त्यांच्या सहभागाचा लाभ महाराष्ट्र सरकारने घेतला आणि थोरल्याच्या लग्नात धाकट्याची मुंज उरकून टाकावी तसे काही प्रकल्पांचे भूमिपूजन इत्यादी पंतप्रधानांच्या हस्ते करून टाकले. त्याचेही स्वागत. उगाच आणखी एक फेरी कशाला असा विचार त्यामागे असणार. असो. यानिमित्ताने एका कार्यक्रमात बोलताना पंतप्रधानांनी मुंबईस जगाची 'फिन-टेक' (वित्त-तंत्र) क्षेत्राची राजधानी करण्याचा मनोदय व्यक्त केला. संगणक वा मोबाइलच्या माध्यमातून अधिकाधिक आर्थिक व्यवहार करवण्याच्या नव्या तंत्रास अलीकडे चांगलीच मागणी आहे. पेटीएम, मोबिक्विक, गूगल पे, फोन पे आदी या विस्तारत्या क्षेत्राची उदाहरणे. यांच्या आणखी विकासास मुंबईने चालना द्यावी आणि या क्षेत्रात आघाडी घ्यावी असा पंतप्रधानांच्या म्हणण्याचा अर्थ. तो अर्थातच स्पृहणीय. तथापि पंतप्रधानांनी मुंबईस फिन-टेकच्या मधाचे बोट लावल्यानंतर दुसऱ्याच दिवशी गुजरातेतील 'गिफ्ट सिटी'ने पुढील अर्थसंकल्पात कोणकोणत्या सवलती मागितल्या आहेत याचे वृत्त आले. आधीच या 'गिफ्ट सिटी'वर सरकारने सवलतींची खैरात केलेली आहे. त्यात आता या नव्या सवलती मिळाल्यास मुंबईस जागतिक वित्त-तंत्र क्षेत्र राजधानी बनवण्याचे काय हा प्रश्न पडतो.तर या 'गिफ्ट सिटी'च्या स्पर्धेत असलेल्या मुंबईचे काय होणार हा प्रश्न आहे. पंतप्रधानांनी काहीही म्हटले असले तरी एक वास्तव अमान्य करता येणे अवघड. ते म्हणजे मुंबईचे राजकीयदृष्ट्या अनाथ (की बेवारस?) असणे. या शहरास वाली नाही आणि केंद्रात या शहराची जोरदार वकिली करेल, शहराच्या वतीने रदबदली करेल असे नेतृत्व नाही. त्यामुळे अन्य राज्यांच्या मागण्या त्वरेने मान्य होत असताना मुंबई आणि महाराष्ट्रास बराच काळ प्रतीक्षा सहन करावी लागते. मध्यंतरी यातूनच महाराष्ट्रात येऊ शकणारे/ घातलेले काही प्रकल्प गुजरातेत गेल्यामुळे राजकीय वाद झाला. पण त्यातून साध्य काहीच झाले नाही. गेले ते गेले आणि येणे अपेक्षित आहेत ते अजूनही आलेले नाहीत. वास्तविक एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस हे केंद्रातील आघाडी सरकारचे घटक आहेत. पण चंद्राबाबू नायडू यांच्या वा बिहारातील नितीशकुमार यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील घटक पक्षांस किती महत्त्व आणि मान दिला जातो, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. एकसंध शिवसेना सत्ताधारी भाजप-आघाडीचा भाग होती तेव्हाही केंद्रात 'अवजड उद्योग' वा तत्सम निराकार मंत्रालयावर त्या पक्षाची बोळवण केली जायची. त्यामुळे केंद्रातील सत्तेत सहभागी असल्याचा महाराष्ट्रास कधी घसघशीत फायदा झाला, याचे अलीकडचे उदाहरण दुर्मीळ. आताही चंद्राबाबू नायडू ज्या पद्धतीने आपल्या राज्याच्या पदरात अधिकाधिक लाभ केंद्राकडून पाडून घेण्यात यशस्वी होतात, ते पाहता महाराष्ट्राच्या आघाडीवर आर्थिक क्षेत्रात तशी शांतताच दिसते.अशा परिस्थितीत 'गिफ्ट सिटी'ला अधिकाधिक सवलती मिळत गेल्या तर मुंबईचे महत्त्व आपोआप कमी होणार हे सांगण्यास अर्थतज्ज्ञ असण्याची गरज नाही. तेव्हा मुंबईच्या भल्याची इच्छा पंतप्रधान व्यक्त करत असताना 'गिफ्ट सिटी'च्या अधिक भल्याची पावले उचलली जाणार असतील तर परिणाम काय होईल, हे उघड आहे. मुंबईसाठी काही खरोखरच करावयाचे असेल तर अलीकडच्या प्रथेप्रमाणे येथील राजकारण्यांनी एकमुखाने पंतप्रधानांकडे या शहरासाठी परत-भेट मागायला हवी. केवळ शब्दसेवेपेक्षा दिल्लीतील 'महाशक्ती'कडून असे 'रिटर्न 'गिफ्ट'' मिळवता येणे मुंबई आणि महाराष्ट्रासाठी अधिक महत्त्वाचे असे

# शेतकऱ्यांना कुबड्या नको, स्वातंत्र्य द्या!



'शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे की कमकुवत?' हा रमेश पाध्ये यांचा लेख (लोकसत्ता विचारमंच- १२ जुलै) वाचला. हा लेख पटण्याजोगा नाही कारण त्यातील मांडणी वाचकांची दिशाभूल करणारी आहे. हा लेख प्रामुख्याने किमान आधारभूत किमती व त्यात झालेल्या 'अवास्तव' वाढीवर बेतलेला आहे. आधारभूत किमतीच्या कुबड्या काढल्या तर शेतकरी सक्षम कसा होईल या बाबतीत मात्र ते काही बोलत नाहीत.मी शेतकरी संघटनेचा अध्यक्ष होतो, तसेच मोदी सरकारने २०२० साली पारित केलेल्या तीन कृषी कायद्यांना स्थगिती दिल्यानंतर, कायद्यामध्ये दुरुस्त्या करून शिफारशी करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या तीन सदस्यांच्या समितीत मी एक सदस्य होतो. शेतकरी संघटनेने किमान आधारभूत किमतीचे (एमएसपी) समर्थन कधीचे केलेले नाही तसेच एमएसपीचा कायदा व्हावा या मागणीला कडाडून विरोध केला आहे. इतकेच काय, शरद जोशींनी कृषी मूल्य आयोग बरखास्त करा अशी मागणी केलेली आहे.सीमांत शेतकऱ्याच्या शिवारात त्याच्या कुटुंबाला पुरेसे धान्य पिकत नाही, असे म्हटले आहे. सीमांत शेतकऱ्यांची व्याख्या म्हणजे पाच एकर ते अडीच एकर शेत जमिनीचा मालक अशी आहे. एखाद्या सीमांत शेतकऱ्याने पाच एकर गहू केला तर महाराष्ट्रात त्याला सरासरी ८० ते १०० क्विंटल गहू होतो. (पंजाबमध्ये याच्या दुप्पट होतो.) हा सीमांत शेतकरी काय १०० क्विंटल गहू घरी खाणार आहे का? त्याने कापूस, सोयाबीन, तुर, हरभरा केला तर एकरी किमान १० क्विंटल उत्पादन येते. हे सर्व तो घरी खातो का? एक एकरचा शेतकरी असला तरी त्याला बाजारात माल घेऊन जावेच लागते.शेतीमाल उत्पादनात शेतकऱ्यांचा कुटुंबाचे योगदान १० टक्केच आहे असे कृषीमूल्य आयोग सांगतो. शेतकऱ्याने उत्पादनाच्या प्रक्रियेत एवढे कमी योगदान दिल्यावर, स्वाभाविकपणे, त्याच्या वाट्याला आर्थिक संपन्न जीवन येणे संभवत नाही हे पाध्ये यांचे विधान क्लेशदायक आहे. व्यापारी उद्योगपतींच्या कुटुंबीयांचे योगदान किती टक्के असते? ते मात्र संपन्न जीवन जगू शकतात. देशातील ६० टक्के जनतेला संपन्न जीवन जगण्याचा अधिकारच नाही असे पाध्ये यांचे म्हणणे आहे का?भारत कृषीप्रधान असल्यामुळे शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. शेतकऱ्याच्या खिशात पैसा आला तर त्याची क्रयशक्ती वाढेल, तो अनेक वस्तू, सेवांसाठी पैसा खर्च करेल. औद्योगिक उत्पादनांना मागणी वाढेल, कारखाने उभे राहतील, रोजगारनिर्मिती होईल, भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढेल, दरडोई उत्पन्न वाढेल व देश समृद्ध होईल. व्यापाराच्या शर्ती कृषी क्षेत्राच्या बाजूने नाही झाल्या, किमान समतल झाल्या तरी भारत देश अधिक गतीने पुढे जाईल, खऱ्या अर्थाने 'विकसित' होईल यात तीळमात्र शंका नाही.

## माजलगावचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

### ज्ञानेश्वर मेंडके: मुख्याधिकाऱ्यांनी पाणीप्रश्न सोडवावा अन्यथा आंदोलन करू

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील सहा दिवसांपासुन माजलगाव शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला असुन शहरवासीयांचे हाल होत आहेत. अशा परिस्थितीत पालिकेचे मुख्याधिकारी हे सतत गैरहजर असतात व बोगस बिले काढण्यात ते मशगुल आहेत. त्यामुळे तात्काळ पाणीप्रश्न सोडवा अन्यथा भाजपाच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी दिला आहे.

मागील सहा दिवसांपासुन शहराचा पाणीपुरवठा कर्मचा-यांच्या अचानकच्या संपामुळे बंद आहे. भर पावसाळ्यात शहरवासीयांना पाण्याकरीता भटकंती करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाचा निष्क्रीयपणा पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. पाणीपुरवठ्यासोबतच शहरात अस्वच्छता पसरली असुन पथदिवे देखिल बंद आहेत. या सर्व कामांचे टेंडर असतांना देखिल शहरवासीयांना मात्र पाणी, विज, पथदिवे, स्वच्छता या मुलभूत सुविधांपासुन वंचित रहावे लागत आहे. पालिकेचा कार्यकाळ संपलेला असुन मुख्याधिकारी हे प्रशासक आहेत परंतु मुख्याधिकारीच गैरहजर असल्याने विवीध कामे खोळंबली असुन कर्मचा-यारी देखिल सतत गैरहजर असतात त्यामुळे त्यांचेवर कुणाचाही वचक राहिलेला नसुन याप्रश्नी मुख्याधिका-यांनी तात्काळ लक्ष घालुन पाणीप्रश्नासह मुलभुत सुविधा तात्काळ पुरवाव्यात अन्यथा भाजपाच्या वतीने पालिका प्रशासनाचा निषेध करत तिव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपाचे जेष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी दिला आहे.

## पान एक वरून

**लाडक्या भावांनो तुम्हाला...**

अर्थसंकल्पाद्वारे जाहीर केली होती. सरकारने लाडक्या भावांसाठी कुठलीही नवी योजना जाहीर केलेली नाही. त्यांनी जुन्याच योजनेला 'लाडका भाऊ योजना' म्हटलं आहे, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.आव्हाड यांनी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की लाडका भाऊ वगैरे अशी कोणतीही नवीन योजना नाहीये, तर अर्थसंकल्पात जाहीर केलेली योजनाच परत सांगितली जात आहे. त्यातही तरुणांना १०,००० रुपये देण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र आता सरकारने त्याची ६०००, ८००० आणि १०,००० रुपये अशी विभागणी केली आहे.

**पूजा खेडकरांनंतर प्रफुल...**

पोस्ट केले. त्यानंतर त्यांच्या दिव्यांग असल्याच्या प्रमाणपत्राचा वाद निर्माण झाला. देसाई हे सध्या करीमनगरमध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. देसाई यांनी यूपीएससीच्या परीक्षेत ओएच ऑर्थोपेडिकली हँडीकॅप्ड कोट्याचा दुरुपयोग केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.याबाबत देसाई यांना विचारलं असता त्यांनी सगळे आरोप फेटाळले आहेत. ते म्हणाले, माझा एक पाय अधू आहे, मात्र याचा अर्थ असा नाही की मी शारिरीक कसरतींमध्ये सहभागी होऊ शकत नाही. माझ्या ट्रेनिंग दरम्यानही अशा काही कसरती झाल्या ज्यामध्ये मी भाग घेतला होता. इंडिया टुडेने दिलेल्या एका वृत्तानुसार त्यांच्या डाव्या पायात ४५ टक्के अधूपणा आहे. देसाई म्हणाले माझ्या एका पायाला पोलिओ झाला होता. त्यामुळे मी धावू शकत नाही, मात्र चालू शकतो, सायकलही चालवतो. मी नॉर्मल आयुष्य जगू नको का? असाही सवाल त्यांनी केला आहे

**प्रतिभावंत नाटककराला मिळाला...**

इतिहासातील ग्रंथमहत्त्वपूर्ण ठरले. राज्य शासनाच्या सांस्कृतिक संचालनायाच्या बालराज्य नाट्य स्पर्धेत त्यांना लेखन दिग्दर्शनाचे अनेक बक्षीस मिळाले आहेत. सतत अकरा वर्षे राज्य शासनाच्या या नाट्य स्पर्धेत अंतिम फेरीत जाण्याचा विक्रम त्यांच्या परिवर्तन संस्थेने केला. अंतिम फेरीत्यांची चार नाटके सर्वोत्कृष्ट ठरली डॉ .साळुंके हे सध्या राज्य शासनाच्या रंगभूमी प्रयोग परीनिरीक्षण मंडळाचे सदस्य असून केंद्र सरकारच्या संस्कृती विभागाच्या सीसीआरटीची ते राष्ट्रीय स्त्रोत व्यक्ती आहेत. आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय ते त्यांच्या प्राथमिक शाळेतील शिक्षिका चित्राबाई जोशी व संस्कार प्रबोधिनीचे कार्यवाह एडवोकेट कालिदासराव थिगळे यांना देतात. डॉ .साळुंके हे बीडच्या संस्कार विद्यालयाचे निवृत्त शिक्षक आहेत.

**विशाळगडावर हिंसाचार...**

अजित पवार म्हणाले, संभाजीराजेंबरोबर आम्ही बैठक घ्यायला तयार होतो. चर्चेतून मार्ग काढला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबरही सगळ्या जाती-धर्मांचे लोक होते. संभाजीराजेंनी देखील धीराने घ्यायला पाहिजे होतं. आता ते सरकारवर टीका करत आहेत, मात्र या सगळ्याला सरकार कसं काय जबाबदार?

**काँग्रेसचा मुख्यमंत्रिपदाचा...**

उपस्थितांनी हसून दाद दिली.सांगलीच्या राजकारणात सध्या खासदार विशाल पाटील व आमदार विश्वजीत कदम या जोडीची बरीच चर्चा रंगतेय. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विशाल पाटील यांना काँग्रेसने उमेदवारी नाकारली होती. महाविकास आघाडीत सांगलीच्या जागेवर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटील उभे राहिले. मात्र या निवडणुकीत विशाल पाटलांनी चंद्रहार पाटलांसह माजी खासदार संजयकाका पाटलांना पराभूत केलं. या निवडणुकीच्या काळात विशाल पाटलांना उमेदवारी मिळावी यासाठी विश्वजीत कदमांनी बरेच प्रयत्न केले. मात्र, काँग्रेसने तिकीट नाकारल्यानंतर विशाल पाटलांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला. या काळातही कदमांनी पाटलांची साथ दिली. आता विधानसभेच्या निवडणुकीत विशाल पाटील विश्वजीत कदमांसाठी मोर्चेबांधणी करत आहेत.

**शिवसेनेचे सामाजिक...**

नितीन भोसले, दत्ता मुळूक ,प्रशांत मुळूक, प्रवीण मुळूक, भाजपा विद्यार्थी आघाडीचे संदीप उबाळे, पंकज मुळूक, देवा ननवरे, बाळासाहेब ननवरे ,अशोक गडदे, विकी नाटकर, विकास लांडगे तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान सहा वरून

**बंद झालेली बससेवा...**

झाली होती आणि छोट्या वाहणांची एकेरी वाहतूक गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होती. मोठी वाहने जात नव्हते म्हणून बस सेवा बंद झाली होती. कानडी माळी येथील काही लोकांच्या या रस्त्याबाबत काही तक्रारी होत्या म्हणून दुसऱ्या बाजूने सिमेंट रस्ता व्हायला वेळ लागत होता आणि हा प्रश्न अनेक दिवस झाले तरी सुटत नव्हता म्हणून लोकांनी संताप व्यक्त केला होता. त्यानंतर मग बाजूच्या खोल भागात मुरुम टाकून सध्याचा रस्त्याचा मार्ग मोकळा केला गेला आहे. हे पाहून या चार पाच गावातील प्रवासी तसेच शाळां, कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थिनी आता लवकरच बस सुरू होणार म्हणून आनंद व्यक्त करत आहेत. आजारी प्रवासी यांना देखील मोठा दिलासा मिळाला आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले आहे म्हणून हा प्रश्न सुटला आहे आशा प्रतिक्रिया प्रवाशांकडून येत आहेत.

**अधिकारी वर्गाने...**

सर्व प्रकाराची विस्तृत चौकशी करून लोहगाव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व त्यांना पाठीशी घालण्याचे काम करणारे राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या कामकाजाची चौकशी करून त्यांचे निलंबन करावे अशी मागणी युवा ग्रामीण पत्रकार संघाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती राज्याचे प्रधान सचिव व ग्रामविकास विभागाच्या सचिवांनाही पाठविण्यात आल्या आहेत,

**केज विधान सभेसाठी...**

नमीता मुंदडा यांनी घेतला आहे व जनतेला वाऱ्यावर सोडून स्वाताची खळगी भरण्यासाठी आमदारा नमीता मुंदडा यांनी प्रत्येक विकास कामांमध्ये कमीशन एजन्ट सारखे टक्केवारी घेऊन गुत्तेदारारांने काम केले आहे का नाही काच्याशी आमदारा नमीता मुंदडा यांना देणेघेणे नाही अशा भ्राष्ठचारी आमदारा नमीता मुंदडा यांचा येणाऱ्या विधानसभेसाठी पत्ता कट झाल्यामुळे जनता जनार्दन अतिशय आनंदीत झाल्याचे दिसून येते आहे तरी महायुतीने जनतेचा कौल लक्षात घेऊन भ्रष्टाचारी आमदारा नमीता मुंदडा यांना येणाऱ्या काळात विधानसभेत भाजप पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकारी यांनी आमदारा नमीता मुंदडा यांना पक्षाकडून उमेदवारी द्यायला नाही पाहिजे असे सुध्दा चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**तांडा वस्ती योजनेत मोठा...**

कार्यवाही करणे गरजेचे आहे.सिमेंट रस्ता बनवतांना त्याखाली खडी टाकने आवश्यक आहे परंतु या सरपंच पती ने अभियंता यांच्या उपस्थित विहिरीचे बदाड टाकले आहे जे विहीर खोदकाम करतांना ब्लास्टींग घेवून काढण्यात येते ते निर्जीव झालेलं असते,तसेच या कामावर मुरूम टाकण्यात आला त्याची रॉयल्टी भरली आहे की नाही याचीही चौकशी करण्याची मागणी निवेदनात केली आहे.याकडे वरिष्ठ अधिकारी यांनी गांभीर्याने पाहून सदर होत असलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाची पाहणी करून चौकशी करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हा युवा उपाध्यक्ष शेख खिजर सौदागर यांनी जिल्हाधिकारी बीड,मुख्य कार्यकारी अधिकारी बीड,तहसीलदार गेवराई, गटविकास अधिकारी पं .समिती गेवराई यांच्या कडे केली आहे.

**सुधाकरच्या निर्वाणाने चळवळीची....**

यांनी अनेक वृत्तपत्रात स्वाभिमानी पत्रकारिता केली. आंबेडकरी चळवळीत त्यांचं मोलाचं योगदान होत. सुधाकर सोनवणे यांच्या पत्रकारितेने अनेकांना न्याय मिळवून देण्याचं काम अविरतपणे केलं. उपेक्षित,कष्टकरी,श्रमिक, कामगार यांच्यावर त्यांनी सातत्याने लिखाण केलं होतं.आज पत्रकार सुधाकर सोनवणे यांच्या जाण्याने सोनवणे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे. त्यांच्या दुःखात माझे कुटुंब आणि रिपाइं सहभागी आहे. अशी आदरांजली युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी व्यक्त केली.

**विशाळगड हिंसाचार प्रकरणी...**

आला.तसेच घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक शासश करण्यात यावे अशी मागणी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अनिल मुंडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद हानिफ उर्फ बहादुरभाई,परळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद गटाचे शहर अध्यक्ष अँड जीवनराव देशमुख, काँ.अँड.परमेश्वर गित्ते, शहर उपाध्यक्ष सुभाष देशमुख, इतेशाम खतीब,राष्ट्रवादी गटाचे फेरोजभाई, जमील अध्यक्ष,काँग्रेस प्रवक्ते बद्दर भाई, अनुसूचित जाती जमातीचे परळी शहर अध्यक्ष दीपक शिरसाट,अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष सद्दाम भाई,सैय्यद वाजेब, इनामदार, सय्यद अमजद अदी इंडिया आघाडी व घटक पक्षाचे प्रमुख नेते कार्यकर्ते उपस्थित होते

**आषाढीनिमित्त विठ्ठल...**

पालकांनी यावेळी फुगडी धरून दिंडीत सहभागी झाले. महिलांनी दिंडीमध्ये असलेल्या पालखीला हळदीकुंकू वाहून मनोभावे दर्शन घेतले. संस्थेचे अध्यक्ष शामराव गुरुजी राठोड यांनी वारकरी संप्रदायाबद्दलची माहिती दिली. तिरुपती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा येथे वारकरी दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. तुळशी, पताका व टाळ घेऊन विठ्ठल भक्तीत रममाण झालेले विद्यार्थ्यांनी साऱ्यांचे लक्ष वेधले. या विद्यार्थ्यांची दिंडी पाहून क्षणभर पंढरपुरात असल्यासारखे वाटल्याच्या भावना उपस्थित पालकांनी व्यक्त केल्या. याप्रसंगी शाळेचे अध्यक्ष शामराव राठोड (गुरुजी ), सचिव गोरक्षनाथ (आण्णा) राठोड, माध्यमिक मुख्याध्यापक श्री. राजेंद्र दाभाडे सर, प्राथमिक मुख्याध्यापक राजेश खरसाडे सर, थापडे सर , शिंदे सर , वाव्हळ सर , खेत्रे सर, साबळे सर, मोटे सर , राऊत सर , चव्हाण सर , राठोड सर , बनसोडे सर, विशाल सर, कानडे सर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

**सिरसाळ्यात सावित्रीच्या...**

सदरील मुलीच्या अब्रुवर घाला घातला असता, हा प्रकार सिरसाळ्यात वा-या सारखा पसरला,मुलगी पळून गेल्याने रोमिओ पसार झाला , तो रोमिओ कोण होता काही समजले नाही ,परतु असे रोमिओ नविन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून महाविद्यालय परिसरात ठाण मांडून आहेत.

मुलगी दिसली की तिच्या मागे गाड्या फारवणे ,मागे फिरणे ,तिची कुचंबणा करणे किंवा तिला बोलण्याचा प्रयत्न करणे आणि जमलेच तर धरण्याचा प्रयत्न करणे असे प्रकार होत आहेत. काल घडलेला प्रकार याचे गंभीर उदाहरण आहे.शाळा भरण्या पासुन ते सुटण्या पर्यंत रोमिओ ह्या परिसरात लक्ष ठेवून असतात, शाळा सुटली कि शाळेच्या गेट पासुन ते मुलगी ज्या गावची आहे त्या गावच्या वेशीपर्यंत पाठलाग केला जात आहे . शिक्षण बंद होईल म्हणून मूली हा प्रकार सहन करत आहेत . सिरसाळ्यात रोडरोमिओंचा प्रश्न गंभीर होत आहे.ह्या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत सिरसाळा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल नव्हता. घटनेचे गांभीर्य ओळखत न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी सिरसाळा पोलीस स्टेशन ला निवेदन दिले ज्यात म्हटले आहे कि , शाळा परिसरात रोडरोमिओंचा त्रास वाढलेला आहे ,तरी पोलीस प्रशासनाने या कडे लक्ष द्यावे अशी मागणी केली आहे .

**योजना चांगली पण....**

सदरील कामाची चौकशी करुन व तपासणी करुनच संबंधीत कंत्राटदारास बील देण्यात यावे अन्यथा ग्रामस्थ उपोषणास बसतील याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील.मा. कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जि.प., बीड यांच्या कडे निवेदनाद्वारे गावकऱ्यांनी मागणी केली आहे तरी जलजिवन विहीरीचे व पाइपलाइनचे काम अर्धवट व भोगस करणाऱ्या भुरट्या गुत्तेदारांला कामाची चौकशी करून कामाची रक्कम देण्यात यावी अन्यथा ग्रामस्थ उपोषणाला बसणार आहेत असा इशारा निवेदनाद्वारे कोरडेवाडी ग्रामस्थांनी दीला आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# सोयगाव शहराला दूषित पाणी पुरवठा

**सवाल** शहर वासीयांचे आरोग्य धोक्यात

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहराला थेट धरणातून दूषित पाण्याचा पुरवठा बुधवारपासून सुरू आहे गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशीही शहरवासीयांना वेताळवाडी धरणातून पिवळा रंगाचा पाणी पुरवठा झाला आहे त्यामुळे शहरवासीयांमध्ये रोष पसरला आहे सोयगाव नगर पंचायतीचे पाणी पुरवठा यंत्रणेतून हा प्रकार सर्रास सुरू आहे

वेताळवाडी धरणातून सोयगाव शहराला साठवण टाक्या मधून पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्यात येतो परंतु नुकत्याच झालेल्या पावसात सोयगावचे वेताळवाडी धरण शंभर टक्के भरले असून या धरणातील नवीन पिवळसर पाण्याचा थेट नागरिकांना पाणी पुरवठा होत आहे दरम्यान नगर पंचायतीचे पाणी पुरवठा विभागाकडून पाणी निर्जंतुक करणं न करताच शहरात पाणी पुरवठा होत असल्याचा आरोप शहरातील नागरिकांनी केला असून त्यामुळे दूषित पाणी पुरवठा होत आहे



### शहरात घराघरात पिवळ्या रंगाचे पाणी

शहरात घराघरांत पिवळ्या रंगाचे पाणी पोहचले आहे त्यामुळे हे पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याने शहरवासीयांमध्ये संताप निर्माण झाला आहे तालुका आरोग्य विभागाने तातडीने पाणी नमुने तपासणी साठी घेतले आहे दरम्यान दूषित पाणी पिण्यासाठी मिळत असल्याने शहरात आरोग्याला धोका निर्माण झाला आहे याबाबत प्रभारी मुख्याधिकारी गोरखनाथ सुरे यांनी संबंधित विभागाला सूचना दिल्या असल्याचे सांगितले आहे



# विठू-माऊलीच्या पोषाखात जमला मेळा

**अध्यात्मिक :** केएसपी विद्यालयात आषाढी एकादशी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त लहान मुलांची दिंडी उत्साहात संपन्न झाली. काही विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशात आले होते तर काही विद्यार्थी वारकरी पेहरावात आले होते...या छोट्या वारकऱ्यांनी हातात टाळ आणि डोक्यावर तुळस, हरी नामाचा गजर केला...विद्यार्थ्यांचे ते मनमोहक रूप साक्षात विठ्ठल रुक्मिणी च्या रुपाची आठवण करून देत होते..अतिशय उत्साहात विठ्ठल नामाच्या गजरात मुलांची दिंडी काढण्यात आली.जय हरी विठ्ठल नामाचा गजर करत मुलांची दिंडी शाळे जवळील मंदीरात जाऊन संपन्न झाली. यावेळी मुलांना फराळ वाटप करण्यात आला. आपल्या भारतीय सण, उत्सव, समारंभ संस्कृतीचे जतन करणे हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच कार्यक्रमाचे मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत आषाढी दिंडी साजरी करण्यात आला.

# साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठेंना अभिवादन!



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते, पृथ्वीराजे पंडित, शफीक भाऊ शेख, प्रा गोपाळ बप्पा धांडे, स्वाभिमान संघटनेचे अध्यक्ष सचिन उबाळे,राहुल दुबाळे, नगरसेवक सनी भैय्या वाघमारे, समाजसेवक भारत आण्णा कांबळे, डिगु नाना फाटे पाटील, सुनील कांबळे साहेब, प्रदिप थोरात अध्यक्ष, अक्षय भाई कोकाटे, दिपक घोरपडे, सागर धन्वे, सुधाकर डोंगरे, बबलू गरजे, गौरव वैद्य, विलास जोगदंड, आयोजन, विजय चांदणे, जय चांदणे, सचिन गालफाडे कापसे मामा, सतिश थोरात, शैलेश दोडके, गणेश भिसे, अजय दळवी, विजय धुतवळे, ओमकार चांदणे, गणेश चांदणे,यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# विद्युत तार निखळून पडली

**दुःखद :** एका महिलेचा झाला जागीच मृत्यू !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज - शेतातील पोलवरील विद्युत तारा वाऱ्याने एकमेकांना चिटकून स्पार्किंग होऊन विद्युत तार निसटून खाली आल्याने खुरपणी करीत असलेल्या एका ४५ वर्षीय महिलेला शॉक बसल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना मानेवाडी (ता. केज) येथे बुधवारी (दि. १७) दुपारी २.३० वाजेच्या सुमारास घडली. मानेवाडी (ता. केज) येथील विमल बाबुराव माने (वय ४५) या बुधवारी शेतात कापूस पिकात खुरपणी करीत होत्या. दुपारी २.३० वाजेच्या सुमारास वाऱ्याने पोलवरील विद्युत तारा एकमेकांना चिकटून स्पार्किंग झाल्याने एक विद्युत



तार पोलवरील चिनीमातीच्या मन्यातून निसटून खाली येत लोंबकळली.मानेवाडी (ता. केज) येथील विमल बाबुराव माने (वय ४५) या बुधवारी शेतात कापूस पिकात खुरपणी करीत होत्या. दुपारी २.३० वाजेच्या सुमारास वाऱ्याने पोलवरील विद्युत तारा एकमेकांना चिकटून स्पार्किंग झाल्याने एक विद्युत तार पोलवरील चिनीमातीच्या मन्यातून निसटून खाली येत लोंबकळली. याचवेळी खुरपणी करीत असलेल्या विमल माने या उठून पुढे सरकत असताना लोंबलेली विद्युत तार त्यांच्या गळ्याला लागून गळा भाजला आणि जोराचा शॉक बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या आदेशावरून फौजदार बसवेश्वर चनशेट्टी, फौजदार राहुल पतंगे, सहाय्यक फौजदार रमेश सिरसाट यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा करीत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या शवगृहात मृतदेह ठेवण्यात आला असून गुरुवारी शवविच्छेदन करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक फौजदार रमेश सिरसाट यांनी दिली. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी असून घटनेबद्दल गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## राजाभाऊ दहिवाळ यांचे निधन

परळी/पुण्यभूमीप्रतिनिधी



शहरातील भाजपा चे जुन्या पिढीतील माजी नगरसेवक तथा दीनदयाळ बँकेचे संचालक राजाभाऊ रामभाऊ दहिवाळ यांचे वयाच्या ६७ वर्षी बुधवार दि. १७ जुलै रोजी रात्री ११ वाजता हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर दि १८रोजी दुपारी १ च्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन मुले एक मुलगी भाऊ, भावजया असा मोठा परिवारआहे.माजी नगरसेवक राजाभाऊ दहिवाळ हे भाजपाचे एक सच्चे कार्यकर्ते होते. त्यांच्या जाण्याने एक समंजस आणि तळागाळातील लोकांना सोबत घेऊन चालणार कार्यकर्ता पडद्याआड गेला आहे. त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# काँग्रेसचा विजय कोणीही रोखु शकत नाही

**गणेश बजगुडे :** बीड विधानसभा काँग्रेसने लढवण्याची मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



विधानसभा निवडणुका काही दिवसावर येऊन ठेपल्या असताना सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागलेले आहेत. त्यातच काल माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदार संघाचा आढावा घेण्यात आला. यावेळी बीड विधानसभा काँग्रेस पक्षाला सोडुन घेण्याची मागणी सर्वानुमते करण्यात आली. बीड मतदार संघात काँग्रेस पक्षाला जनाधार असुन बीडची जनता पंजाच्या शोधत आहे. परंतु आघाडीच्या समीकरणात जिल्ह्यात जाणीवपूर्वक काँग्रेसला जागा सोडली जात नाही आघाडीच्या नेत्यांकडून जाणीवपूर्वक काँग्रेस पक्षाला कमकुवत करण्याचे काम केले जात असेल व काँग्रेस पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेले आमदार खासदार जरी पक्ष सोडून गेले असले तरी मतदार मात्र आज काँग्रेसच्या सोबत आहे बीड विधानसभा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पंज्याच्या चिन्हावर लढवल्यास विजय निश्चित आहे. त्यामुळे मतदार संघातील मतदारांच्या भावनेचा आदर राखत महविकास आघाडीने बीड विधानसभेची जागा काँग्रेस पक्षाला सोडण्यात यावी त्याचबरोबर जर आघाडीतील नेते जर सन्मानाने बीडची जागा सोडत नसेल तर आपण किती दिवस फरफट सहन करायची स्थानिक स्वराज्य संस्थेपासुन लोकासभेपर्यंत जिल्ह्यात असलेल्या काँग्रेसच्या जनधरामुळे काँग्रेस सोबत असली पाहिजे परंतु जागा वाटपात किंवा निवडणुकी नंतर मात्र काँग्रेसला कुठेही विचारात घेतले जात नाही त्यामुळे सन्मानाने बीडची जागा काँग्रेसला नसोडल्यास काँग्रेसने स्वतंत्र लढले पाहिजे. जनता काँग्रेस सोबत असुन बीड विधानसभेत काँग्रेसचा विजय कोणीही रोखु शकत नाही. असे बीड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केली.

## हार्दिक पंड्या-नताशाचा घटस्फोट

मुंबई : भारताला टी२० विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा क्रिकेटपटू हार्दिक पांड्याच्या आयुष्यात सध्या मोठी उलथापालथ झाल्याचं पाहायला मिळत आहे. हार्दिक पांड्या (क्रीवळ्ज्ञ झरवूर) त्याची मॉडेल पत्नी नताशा स्टॅनकोविक (छर्ीींरहर डींरपज्ञेींळल) एकमेकांपासून विभक्त झाले आहेत.

मागील काही काळापासूनच यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या बातमी समोर येत होत्या. मात्र, आता अखेर या दोघांनी घटस्फोटाची घोषणा केली आहे. हार्दिक आणि नताशाने सोशल मीडियावर पोस्ट करत एकमेकांपासून वेगळे झाल्याचं जाहीर केलं आहे.

क्रिकेटर हार्दिक पांड्या आणि नतासा स्टॅनकोविक यांनी एकमेकांपासून वेगळे होण्याची घोषणा केली आहे. गुरुवारी संध्याकाळी दोघांनीही त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाऊंटवरुन निवेदन पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिलं आहे की, हा त्या दोघांसाठी एक कठीण निर्णय होता आणि परस्पर सहमतीने ते एकमेकांपासून विभक्त होत आहेत. त्यांच्या ३ वर्षाच्या मुलगा अगस्त्य याचा दोघे मिळून सांभाळ करतील, असं म्हटलं आहे.

# बीडमध्ये कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**धोरण :** स्व.झुंबरलाल खटोड प्रतिष्ठानचा उपक्रम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील वीस वर्षांपासून सातत्याने राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात अध्यात्मिक चळवळ निर्माण करणाऱ्या स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दि. २१ जुलै ते २७ जुलै २०२४ या कालावधीत दररोज सकाळी १० ते रात्री १० या वेळेत बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात कीर्तन महोत्सव आणि कथा ज्ञान अमृत सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील भाविक भक्तांनी सहकुटुंब या कीर्तन श्रावणाचा आणि कथा ज्ञान यज्ञाचा लाभ घ्यावा असे आवाहन स्व. झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

आषाढी एकादशी नुकतीच संपन्न झाले असून या निमित्त दि. २१ जुलै ते २७ जुलै या कालावधीत प्रतिष्ठानच्यावतीने शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये दररोज सकाळी १० ते रात्री १० या




वेळेत सांप्रदायिक कीर्तन सेवा आणि दोन कथांच्या आयोजन करण्यात आले आहे या कालावधीमध्ये १२ नामवंत कीर्तनकारांची सांप्रदायिक कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. तसेच दोन कथा संपन्न होणार आहेत. या सर्व कार्यक्रमांचा बीडकर रसिक्रोत्यांनी सहकुटुंब उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन स्वर्गीय झुंबरलाल खटोड सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

**दिलासा** नुकसान झालेल्या भागांचे होणार पंचनामे

# अतिवृष्टीच्या नुकसानीची तक्रार अनिवार्य

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव आणि जरंडी मंडळात सोमवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे खरिपाच्या पिकांच्या नुकसानीची पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांनी ७२ तासांत तक्रार करणे अनिवार्य असून खरिपाच्या नुकसानी साठी ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचेच पंचनामे करण्यात येणार आहे त्यासाठी महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकांनी नुकसानी च्या तीव्रतेची पाहणी सुरू केली आहे

सोयगाव, गलवाडा, वेताळवाडी, जरंडी,निंबायती ,धिंगापूर आणि बहुलखेडा या सात गावांत खरिपाच्या पिकांची अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे बहुलखेडा व धिंगापूर शिवारात नाल्याचे शेती शिवारात शिरल्याने शेतांचा नाला तयार होऊन मका कपाशी पिकांसह शेती वाहून गेली आहे सोयगावच्या सोनासवाडी शिवारात मक्याची पिकं आडवी पडून मोठ नुकसान झाले आहे परंतु या नुकसानी साठी एन डी आर एफ च्या निकषानुसार ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या पिकांचे च महसूल आणि कृषी विभागाकडून पंचनामे करण्यात येणार आहे त्यासाठी महसूल आणि कृषि च्या पथकांनी सोयगाव सह सात गावांत नुकसानी च्या तीव्रतेची पाहणी हाती घेतली आहे दरम्यान खरिपाच्या पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांनी ७२ तासात नुकसानीची तक्रार पीकविमा कंपनीच्या पोर्टलवर करण्याबाबत कृषी विभागाने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे परंतु संबंधित कंपनीचे नुकसानी चे पोर्टल मात्र बंद असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले त्यामुळे ऑफ लाईन तक्रारी स्वीकारण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे .सोयगाव व जरंडी मंडळात सोमवारी अतिवृष्टी झाली यामध्ये सात गावात खरिपाच्य पिकांची नुकसान झाले बहुलखेडा धिंगापूर वेताळवाडी या शिवारात पिकांसह शेती खरडून वाहून गेली आहे त्यामुळे सात गावांत ३४१ शेतकरी बाधित झाली आहे.



सोयगाव मंडळात सात गावात अतिवृष्टीमुळे पिकांची नुकसानी साठी पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांनी ७२ तासात कंपनीच्या पोर्टल वर तातडीने माहिती द्यावी तसेच कृषी सहायकांना नुकसानीची पाहणी करण्यासाठी सूचना दिल्या आहे
-मदन शिदोदिया,तालुका कृषी अधिकारी सोयगाव

शासन निर्णया अन्वये नुकसानी च्या पंचनामे साठी ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसानी चा निकष लागू आहे सोयगाव मंडळात झालेल्या ७२ मी मी पावसाने खरिप पिकांच्या नुकसानी ची माहिती तलाठी यांचेकडून संकलित करण्यात येत आहे ३३ ,टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान ग्रस्त भागांत तातडीने पंचनामे करण्यात येऊन नुकसान भरपाई साठी अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात येईल
-मनीषा मेने जोगदंड, तहसीलदार

# मनमानी कारभाराला बसली चपराक!

**माजेद अहमद :** सीईओने दिले कारवाईचे आदेश



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील असलेल्या शिवाजीनगर जिल्हा परिषद उर्दू शाळा शिक्षकांनीच मनमानी कारभार करून विना परवानगी अनधिकृतपणे बंद करून डेप्युटेशन करून दुसऱ्या जवळची शाळा गाठल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. मात्र शिक्षण विभाग याकडे दुर्लक्ष करून झोपले आहे शिक्षण विभागाचे कोणतेही नियंत्रण राहिले नाही असे या प्रकरणातून दिसून येते. शाळा तात्काळ पुन्हा सुरू करून याची चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजेद अहमद व सचिव शेख इरशान यांनी डेप्युटी सीईओ प्रदीप काकडे यांना निवेदन देऊन केली आहे तसेच याप्रकरणी सीईओ यांनी विभाग प्रमुखला तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहे.

# शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम पीक स्पर्धा!

सहभागी होण्याचे कृषी विभागाचे आवाहन • अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल • बीडमध्ये ११ पिकासाठी होणार पीक स्पर्धा • स्पर्धेत जिंकणाऱ्या शेतकऱ्यांना मिळणार बक्षिसे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या पिक उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषी उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरात इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत विकास स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. राज्यात खरीप हंगाम सन २०२४ मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफुल या ११ पिकांसाठी पिकस्पर्धा आयोजन करण्यात आली आहे. पिकस्पर्धेसाठी तालुका हा घटक आधारभूत धरण्यात येतो. शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत घेऊन राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील बक्षीस देण्यात येतात.



### असे असणार बक्षीसाचे स्वरुप

राज्यस्तरीय प्रथम क्रमांक बक्षीस रक्कम रुपये ५० हजार, राज्यस्तरीय द्वितीय क्रमांक बक्षीस रक्कम रुपये ४० हजार,राज्यस्तरीय तृतीय क्रमांक बक्षीस रक्कम रुपये ३० हजार असे बक्षिसे दिली जाणार आहेत.

### असे असणार प्रवेश शुल्क

खरीप हंगाम सन २०२४ स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रु. ३०० व आदिवासी गटासाठी पिकनिहाय प्रत्येकी रक्कम रुपये १५०, प्रवेश शुल्क भरून पीक स्पर्धेमध्ये सहभागी होता येईल. स्पर्धेत सहभागी होण्याची अंतिम तारीख मूग व उडीत पिकासाठी ३१ जुलै २०२४ व भात, ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी), मका, तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२४ अशी अंतिम दिनांक आहे. अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असे कळविण्यात आलेले आहे.

## बंद झालेली बससेवा पुन्हा पूर्ववत

इफेक्ट : दैनिक पुण्यभूमीच्या वृत्ताची दखल



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील कानडीमाळी येथील चौकातील रखडलेल्या रस्त्याच्या कामामुळे एस टी बस सेवा जवळपास तीन महिन्यांपासून बंद झाली होती. यामुळे कानडीमाळी सह त्या परिसरातील जवळपास चार पाच गावातील शाळा कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच वयस्कर प्रवासी, आजारी प्रवासी यांची मोठी गैरसोय झाली होती. अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर देखील रस्त्याचे रखडलेले काम काही पुर्ण होत नव्हते. यामुळे संतप्त प्रवासी व विद्यार्थ्यांनी आवाज उठवला आणि त्या आवाजाला मिडियानेही साथ दिली. विविध दैनिकांमधुन आवाज उठवला गेला. त्यानंतर मग या प्रश्नावर संबंधित यंत्रणा मरगळ झटकून कामाला लागली आणि मुरुम टाकून रस्ता पुर्णपणे सुरू करुन दिला. या ठिकाणी सिमेंट रस्ता काम सुरू होते परंतु एकच बाजू पान २ वर...

## अधिकारी वर्गाने मनम नीची हद्द ओलांडली!

निवेदन : कामचुकार हाकलून देण्याची मागणी



राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहाता तालुक्यातील लोहगाव येथील ग्रामसेवक व तालुक्याचे गटविकास अधिकारी यांच्या कामकाजाची चौकशी करून त्यांच्या निलंबनाची मागणी युवा ग्रामीण पत्रकार संघाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे यासंदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, राहाता तालुक्यातील लोहगाव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांच्याबद्दल नागरिकांमधून अनेकदा संघाकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत त्यासंदर्भात ग्रामसेवक यांना माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविण्यात आलेली माहिती न देणे, माहिती अधिकार अर्ज न स्विकारणे तसेच माहिती प्राप्त करण्यासाठी पाठविलेले पैसेही न स्विकारणे असे गंभीर कृत्य करण्याचे आरोप करण्यात आले आहेत

संघाचे राहुरी तालुका अध्यक्ष अशोक मंडलिक यांनी दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी ग्रामपंचायती संदर्भातील विविध कामकाजाची माहिती मागितली होती ती प्राप्त करण्यासाठी २४ जानेवारी रोजी माहिती अधिकारातील प्रतींच्या संख्येनुसार रक्कम रूपये ३२० व पोष्टल खर्च रू ९० असे एकूण ४१० रूपये रूपये ग्रामपंचायतीच्या प्रवरानगर येथील एडीसीसी बँकेच्या खात्यावर भरणा करण्याचे कळविण्यात आले होते मात्र श्री मंडलिक यांनी सदरची रक्कम मनी ऑर्डरने पाठविली सदर ग्रामसेवकाने ती न स्विकारता परत पाठविली असल्याचे निवेदनात सांगत माहिती जाणूनबूजून लपविण्याचा त्यांचा मानस असल्याचे सांगण्यात आले आहे.

यासंदर्भात श्री मंडलिक यांनी राहात्याचे गटविकास अधिकारी यांच्याकडे १२ जानेवारी रोजी अपिल दाखल केले त्यावर ११ मार्चला सुनावणीसाठी प्रकरण ठेवण्यात आले मात्र परस्पर दुसरे पत्र काढत आपण सुनावणीसाठी गैरहजर असल्याने २६ मार्चला सुनावणी घेण्याचे नमुद केले मात्र तसे पत्र मंडलिक यांना दिले नसल्याचे व अपिल निकाली काढल्याचे निवेदनात म्हटले आहे. गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवक यांना पाठीशी घालण्याचे कृत्य करून त्यांच्या भ्रष्ट कारभारावर पांघरून घालण्याचा प्रकारच त्यांच्या या कृतीतून दिसून येत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. या पान २ वर...

## केज विधान सभेसाठी पत्ता कट?

राजकीय : अजित पवार गट लढवणार विधानसभा!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केज अंबाजोगाई विधानसभा राखीव मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांचा येणाऱ्या विधानसभेसाठी पत्ता कट झाल्याची चर्चा मतदार संघात सुरू झाली आहे.कारण केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघ महायुती कडुन अजित पवार गट लढवणार असल्याचे समजले जाते आहे त्यामुळे आमदारा नमीता मुंदडा यांनी भाजप पक्षाच्या असल्यामुळे महायुती कडुन अजित पवार गट लढवणार असल्याने आमदारा नमीता मुंदडा यांचा येणाऱ्या विधानसभेसाठी पत्ता कट झाल्याची चर्चा मतदार संघात होत आहे व आमदारा नमीता मुंदडा यांच्या वर जनतेच्या रोष मोठ्या प्रमाणात आहे आमदारा नमीता मुंदडा यांनी जनतेचा फक्त मतदान पुरता फायदा भ्रष्टाचारी आमदार पान २ वर...

## तांडा वस्ती योजनेत मोठा भ्रष्टाचार!

सौदागर: गुणवत्ता तपासणी करुन गुन्हे नोंदवा

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा ग्रामपंचायत चां कारभार मंजे आंधळ दळतय अन ....पीठ खातयं असा झाला आहे,दलीत वस्ती,तांडा वस्ती,पाणी पुरवठा योजने सह नरेगा कामात गैरप्रकार झाला असून बोगस कामे करून पैसे हडपण्याचा सपाटा लावला आहे. पाणी पुरवठ्याची कामे करून लाखो रुपये बिल उचलले असताना भर पावसाळ्यात नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली असून सद्या तांडा वस्ती योजने अंतर्गत सुरू असलेले सिमेंट रस्ता व नाली चे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून याची गुणवत्ता तपासणी करून संबंधितावर कार्यवाही करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा



जिल्हाध्यक्ष शेख खिजर सौदागर यांनी निवेदनाद्वारे केली आहे

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,गेवराई तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत तलवाडा ग्रामपंचायत येथील देवितांडा आणि राजुरीमळा (तांडा ) येथे तांडा वस्ती योजने मधून जवळपास तीस लक्ष रुपयाचे सिमेंट रस्ता आणि नाली बांधकाम हे काम सुरू आहेत परंतु ती कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली आहेत व देवीतांडा येथे सुरू असलेले काम हे अभियंता यांच्या उपस्थितीत बोगस होत आहे तरी त्यांचा याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत आहे.त्यांना याबाबत विचारणा केली असता सर्व व्यवस्थित चालले असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येते ही शोकांतिका आहे त्यामुळे या अभियंत्यांची ही चौकशी करून त्याच्यावर पान २ वर...

## सुधाकरच्या निर्वाणाने चळवळीची हानी

दुःखद : पप्पू कागदेंनी वाहिली आदरांजली

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



ग्रामिण भागातून पत्रकारिता सुरु करुन, सुधाकर सोनवणे यांनी मोठे नाव कमावले होते. त्यांच्या अकाली निर्वाणाने आंबेडकरी चळवळीची हानी झाली असून एक पत्रकार आज आपल्यातुन निघून गेला आहे. ही पोकळी कधीही भरुन निघणार नाही अशीच आहे. आशा भावपुर्ण शब्दांत युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी आदरांजली वाहिली.

बीड जिल्ह्यातील शिरुर तालुक्यात येत असलेल्या तगडगाव येथून सुधाकर सोनवणे यांच्या जिवन प्रवासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.सुधाकर सोनवणे पान २ वर...

## आषाढीनिमित्त विठ्ठल नामाचा जयघोष

आध्यत्मिक : तिरुपती आश्रम शाळेचा आषाढी दिंडी

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त तिरुपती आश्रम शाळा पाचेगाव येथे आषाढीच्या निमित्त गुरुवार दि.१८ जुलै रोजी शाळेत बालगोपालांनी विठ्ठल-रुक्मिणीसह वारकऱ्यांची वेषभुषा साकारुन विठ्ठल नामाचा जयघोष करत विठ्ठल नामाची शाळा भरवली तसेच बाल दिंडी काढून आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. आषाढी एकादशीनिमित्त लाखो वारकरी, भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला रवाना झाले आहेत. दरम्यान विठुराया अन् आषाढीचे विशेष महत्त्व शाळेतील चिमुकल्यांना समजावे, या तिरुपती आश्रम शाळा पाचेगाव येथे आषाढी एकादशी निमित्त बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वृक्षदिंडी, रिंगण सोहळा, फुगडी असे अनेक उपक्रम यावेळी घेण्यात आले. चिमुकल्यांनी विठुनामाचा जयघोष करत कार्यक्रमास उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक आणि विठू नामाचा गजर अशा वातावरणात पाचेगाव आणि परिसरात दिंडी सोहळा रंगला. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व अन्य संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी आकर्षण ठरले. बाल वारकरी दिंडी सोहळ्याचे नागरिकांनी ठिकठिकाणी स्वागत केले. विशेष म्हणजे बैलगाडीत विराजमान विठ्ठल रुक्माई नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते.तिरुपती प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळेतर्फे आयोजित दिंडीमध्ये पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. टाळ मृदुंग व विठू नामांनी गावातील पालखी मार्ग निनादला. शाळेतील सर्व शिक्षकांनी मिळून या दिंडीचे नियोजन केले. शाळेचे अध्यक्ष श्याम गुरुजी राठोड, मुख्याध्यापिक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. या दिंडीमध्ये पालकांचा व गावातील महिलांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला अनेक पान २ वर...

## विशाळगड हिंसाचार प्रकरणी निदर्शने

निवेदन:समाज कंटकांना त्वरित अटक करा



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

विशाळगड/गजापूर (कोल्हापूर) येथील हिंसाचार घडवुन धर्मांत द्वेष पसरविणा-या समाज कंटकावर त्वरित कार्यवाही करण्यात येऊन त्वरित अटक करुन कडक शासन करा या मागणीसाठी परळी इंडिया घटक पक्षाच्या वतिने परळी उपविभागीय कार्यालयावर जोरदार निदर्शने व शासन व प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली.

परळी उपविभागीय कार्यालयावर परळी इंडिया घटक पक्षाच्या वतीने जोरदार निदर्शने व शासन व प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत उपविभागीय अधिकारी यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगळ, गाजापुर येथील अतिक्रमनाच्या मुद्द्यावरून धार्मिक द्वेष पसरून दंगली घडवून हिंसाचार करण्यात आला आहे या घटनेत प्रशासन व पोलिस प्रशासनाची भूमिका संशयास्पद असून सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्यात यावी या धार्मिक हिंसाचार घटनेचा इंडिया घटक पक्षा तर्फे निषेध करण्यात पान २ वर...

भयभित | बचावासाठी मुलीने काढला पळ

## सिरसाळ्यात सावित्रीच्या लेकीची छेडछाड

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळ्यात सावित्रीच्या लेकींनी शिक्षण घ्यायचे कि नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. एक दिवस असा जात नाही कि ज्या दिवशी रोड रोमिओंच्या जाचाला मुलींना सामोरे जावे लागत नाही.काल दिनांक १८ जुलै वार गुरुवार रोजी तर हद्दच झाली. सकाळी शाळेत जाणाऱ्या विद्यार्थीनीला भर रस्त्यावर अडवून छेडछाड झाल्याची गंभीर घटना सिरसाळ्यात घडली आहे . सिरसाळ्यात शिक्षण घेण्यासाठी वर्ग ५ वी पासुन माध्यमिक,उच्च माध्यमिक ते पदवी चे शिक्षण घेण्यासाठी मुली येतात. वर्ग ७ वी मध्ये शिक्षण घेणारी अल्पवयीन विद्यार्थीनी सकाळी न्यू हायस्कूल शाळेत जात असतांना येथील औरंपूर रोडवर एका रोमिओने तिला अडवून छेडछाड



**नागरिकांत संतापाची लाट :** सिरसाळ्यात छेडछाडीचा प्रकार सतत होत आहे,रोमिओंच्या त्रासाने मुली खुप त्रस्त आहेत. भितीने कुणी तक्रार करत नाही आणि म्हणावे तसे संबंधित प्रशासन सुद्धा लक्ष देत नाही. जो पर्यंत जबर कार्यवाही होत नाही तोपर्यंत असे प्रकार सतत होत राहतील.

करण्याचा प्रकार केला आहे. छेडछाड करण्यचा प्रयत्न करताचा सदरील मुलीने तिथून पळ काढला व जवळ असणारे घर गाठले . रोमिओ च्या तावडीतून पळ काढल्याने मुलीची अब्रू बचावली नाहीतर संबंधित रोमिओने पान २ वर...

## योजना चांगली पण काम अर्धवट?

आक्रमक:गुत्तेदारांवर कारवाई करण्याची मागणी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील जलजिवन विहीरीचे व पाइपलाइनचे काम अर्धवट व निकृष्ट दर्जाचे झालेले असुन काम बोगस करणाऱ्या भुरट्या गुत्तेदारांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मागनी निवेदनाद्वारे संरपंचासह गावकऱ्यांनी केली आहे तरी अशा प्रकारे भोगस अर्धवट कामगीरी केलेल्या संमंधीत अधिकारी व गुत्तेदार यांच्या वर कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तरी याविषयी सविस्तर वृत्त असे की ग्रा.पं. कोरडेवाडी, ता. केज, जि.बीड. येथील जलजिवन मिशन चे विहिरीचे खोदकाम व पाईप लाईन



चे काम अपुर्ण व निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. तसेच सदरील कामाच्या माहिती फलका नुसार सदरील काम योग्य पध्दतीने झालेले नाही. तसेच सदरील काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे माहिती फलका मधील माहिती १ते १६ मुदया पैकी फक्त २ म्हणजे विहिर खोदकाम व पाईप लाईन ही कामे करण्यात आलेली आहेत. बाकी उर्वरीत कामे झालेली नाहीत. तरी पान २ वर...